**नि.फौ. खटला क्र.१५९५/२०२१**
सरकार वि. शेख अतीक व वैगैरे
**निशाणी क्र. १९**

<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.२ ची जबानी</u>

मी शपथेवर निवदेन करते की,

नाव – अब्दुल हक शेख अब्दुल रहीम
वय – ४६ वर्षे, धंदा – मजुरी
रा. सादात नगर, छत्रपती संभाजीनगर.

**<u>सरतपास अभियोपक्षातर्फे सरकारी वकिल श्री.आर.बी. अवसरमल यांचेमार्फत सुरू</u> –**

तक्रारदार हा माझा भाऊ आहे. मी आरोपी क्र.१ ते ४ यांना ओळखतो. आरोपी हे माझ्या घराच्या समोर राहतात. आमचे दरम्यान काही घटना घडली नाही. पोलीसांनी माझयाकडे चौकशी केली नाही. असे घडले नव्हते की, आरोपी यांनी मला दिनांक २१.१०.२०२० रोजी रात्री १०.३० च्या सुमारास घरासमोर मारहाण केली.

<u>साक्षीदार अभियोगपक्षास मदत करत नसल्याने अभियोक्ता यांना भारतीय पुरावा कायदा कलम १५४ नुसार उलटतपासणी दरम्यान ग्राह्य असणारे प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात येते</u>.

२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २१.१०.२०२० रोजी रात्री १०.३० वाजण्याच्या सुमारास आरोपी क्र.१ ते ४ यांनी ओटयावर बसलेलो असतांना थुकण्याच्या कारणावरुन मारहाण व शिवीगाळ सुरु केली. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी तक्रारदार हा आला, त्याने आरोपी यांना भावास का मारले असे विचारले. हे म्हणणे खरे नाही की, तक्रारदार हा त्यांना समजावुन सांगत असतांना आरोपी क्र.१ याने त्याच्या डाव्या कानाच्या व डोळयाच्या मधील बाजुन फायटरने मारले. हे म्हणणे खरे नाही की, माझा चुलत भाऊ सय्यद नजीर हा तेथे भांडण सोडविण्यासाठी आला

असता आरोपी क्र.४ याने त्याचे उजव्या हातावर कोणत्यातरी वस्तुने मारुन जखमी केले, त्यामुळे हातात रक्त आले. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींविरुध्द माझा लहान भाऊ यांनी तक्रार दिली. आता मला माझे जबाबातील अधोरेखांकित–ब भाग वाचुन दाखवीला. हे म्हणणे खरे नाही की, तो मी पोलीसांना जबाब देताना सांगितला होता. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी व आमचे दरम्यान वाद मिटलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी यांना शिक्षा होऊ नये म्हणुन मारहाणीची घटना झाली नाही असे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, खोटी साक्ष देत आहे.

सरतपास पुर्ण.

**उलटतपास आरोपी क्र.१ ते ४ तर्फे विद्वान विधिज्ञ श्री. एस.बी.पठाण यांनी नाकारला.**

फेरतपास नाही.

**श्रवणोत्तर स्वीकृत,**

Digitally signed by ASHOK RAMAKANT SHENDGE
Date: 2026.04.29 16:57:10 +0530

दिनांकः २९/०४/२०२६ (अ.र. शेंडगे)

अति. मुख्यदंडाधिकारी कोर्ट क्र.१४
औरंगाबाद